# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

MERC/ADM/RTI/068/2020/**034** Dt. 25.01.2021

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत (जेष्ठ नागरीक),
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नं. ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे - ४२१००१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २७.१२.२०२० रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २८.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आपल्या राज्यामध्ये विज वितरण कंपनीचे लायसेन्सी अधिकारी ग्राहकाने नियमबाध्य औद्योगिक कनेक्शन घेतले साध्या ग्राहकाला कल्पना नसते तो औद्योगिक बिल आहे पाहतो व बिल भरतो पण लायसेन्सी अधिकारी जानुन बुजून त्याला भ्रष्टाचारासाठी पावरलुम स्वत:हून नोंद करतो त्यामध्ये ग्राहकाची कोणतीही चूक नसताना एक दोन वर्षानंतर तोच अधिकारी रिकव्हरीचे बिल देतो असे बिल देण्याचा अधिकार ग्राहक न्यायदृष्टीने लायसेन्सीला ५० महिन्याचा असल्याचा जिआर प्रत स्वाक्षरी प्रत मिळावी. | विज अधिनियम कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयात कुठलेही प्रकरण हाताळले जात नाही. उक्त प्रकरणी याबाबत आयोगाच्या कार्यालयात कोणतीही प्रत उपलब्ध नाही.<br><br>आपण विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची आहे तसेच सदर कायदा हा काल्पनिक प्रश्न उपस्थित करण्याची किंवा जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नांची उत्तरे शोधून देणे अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ २(फ) नुसार माहिती मागावी जेणेकरून आपणांस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आपणांस माहिती उपलब्ध करून देणे सोयीचे होईल. |
| २ | मुद्दा क १ प्रमाणे ग्राहकाने औद्योगिक कनेक्शन पूर्ण कागदपत्रासह अधिकाऱ्याने लावले ग्राहक १ वर्षाचे बिल भरल्यानंतर तोच अधिकारी भ्रष्टाचारासाठी त्या ग्राहकाला कोणतही कागदपत्र न देता वाणिज्य टेरीफ वापरत आहे म्हणून विज कायदा २००३ प्रमाणे रिकव्हरीचे बिल देतो व प्रथम अपील अधिकारी तोच असतो ज्याने रिकव्हरी लावली गाहक सर्व पुरावे दिल्यानंतर ही के-२ ग्राहकास देवून चुकीचा भुर्दंड भरा अन्यथा विद्युत निरीक्षक कडे जा प्रमाणिक ग्राहकासाठी हया सर्व बाबी थांबविण्यासाठी ग्राहक न्यायदृष्टीने लायसेन्सी अधिकाऱ्यावर कोठे तक्रार नियम १५.४ मध्ये करता येते त्याची जिआर प्रत स्वाक्षरी मिळावी. | |
| ३ | मुद्दा क्र. २ प्रमाणे विज कायदा २००३ च्या १३५ विज चोरीचा बदल अशाच लायसेन्सी अधिकाऱ्याचा आहेत त्या अशायाचे लाईनस्टॉफ मिटर बाहेर व वायर जॉईन्ट पत्रावर असल्यामुळे चुकीने डायरेक्ट करून जातात जो पावतो काहीकाळा पावेतो थांबून नंतर त्या ग्राहकाची चुक नसताना त्यावर १३५ कलम लावून रिकव्हरी वसुलतात हया बाबी थांबविण्यासाठी विज नियामक आयोग महाराष्ट्राच्या नियमाप्रमाणे प्रत्येक २ महिण्याचा स्थळ तपावणी नसताना चुकीचे २४ महिण्याची रिकव्हरी वसुलण्याचा अधिकार लायसेन्सी असल्याची जिआर प्रत स्वाक्षरी मिळावी. | |

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्रमांक. ०२२-२२१६३९६४/६५/६९
**Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी